|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

North Maharashtra University, Jalgaon

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २७ ( ) १ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जळगाव महापालिकेच्या निवडणूकीत मोठया संख्येने मतदान करुन लोकशाहीचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा असे आवाहन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शुक्रवार, दि.२७ जुलै रोजी मतदान जनजागृती अभियानानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जळगाव रोटरी क्लब जळगाव वेस्टच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर महापालिका आयुक्त चंद्रकांत डांगे, प्र-कुलगुरु पी.पी.माहुलीकर, रोटरी वेस्टच्या अध्यक्षा संगीता पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे उपस्थित होते.

कुलगुरु म्हणाले की, मतदान केल्यानंतरच आपल्या शहराच्या विकासाबाबत किंवा मूलभूत सुविधांबाबत लोकप्रतिनिधींना बोलण्याचा आपल्याला अधिकार आहे. मी एकटयाने मतदान केले नाहीतर काही फरक पडणार नाही ही वृत्ती सोडून मतदानाचा हक्क बजवावा व लोकशाहीचे संवर्धन करावे असे आवाहन त्यांनी केले. श्री.डांगे यांनी कोणत्याही प्रलोभनाला अथवा अमिषाला बळी न पडता डोळसपणे मतदान करण्याचे आवाहन केले. इतर देशांमध्ये मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी लोकांना संघर्ष करावा लागला. आपल्याकडे मात्र घटनेने सर्वांना मतदानाचा हक्क दिला असून मतदान करणे हे आद्यकर्तव्य आहे. कागदोपत्री उमेदवाराचे शिक्षण न बघता समस्यांची जाण असणाऱ्या उमेदवाराला मतदान केले जावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संगीता पाटील यांनी जळगाव शहर विकासापासून दूर असल्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढावी आणि शहराचा विकास व्हावा यासाठी रोटरीच्या वतीने जनजागृती अभियान घेतले जात असल्याचे सांगितले. यावेळी डॉ.गणी मेनन, डॉ.राजेश पाटील यांनी देखील मनोगत व्यक्त करताना मतदानाची टक्केवारी वाढावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमात विनोद ढगे व त्यांच्या सहकाऱ्यांची मतदान जागृतीसंदर्भात पथनाटय सादर केले. यावेळी मतदानाबाबत शपथ घेण्यात आली. तसेच व्यसनमुक्तीचीही शपथ घेण्यात आली. डॉ.नरसिंह परदेशी यांनी ही शपथ दिली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दीपक सोनवणे यांनी केले.

---

जा.क्रः उमवि/१६/ हस्तदेय /२०१८ दिनांक : २७ जुलै, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी